

# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

## नगरसचिव विभागाचे कामकाजाचे स्वरुप

महाराष्ट्र म.न.पा अधिनियम कलम 48 अन्वये नगरसचिव कार्यालयाचे कामकाज होते. या कायदयातील तरतुदीप्रमाणे सर्व कामे पार पाडली जातात.

नगरपालिका सचिव हा म.न.पा.चा व स्थायी समितीचाही सचिव आहे.  या अधिनियमा अन्वये मा.म.न.पा व मा.स्थायी समिती मधील व त्यांचे संबंधी जी कर्तव्ये पार पाडण्याविषयी मा.म.न.पा व मा.स्थायी समिती कडून फर्मविणेत येईल अशी कर्तव्ये पार पाडणे व म.न.पा. च्या कलम 30 व 31 अन्वये म.न.पा ने नेमलेल्या कोणत्याही समितीच्या, स्थायी समितीच्या व तिच्या कोणत्याही समितीच्या कामकाजा विषयी सर्व कागदपत्रे व दस्तऐवज अभिरक्षेत ठेवणे. स्थायी समिती वेळोवेळी जे निर्देश देईल त्यांच्या अधिन असलेल्या अधिकारी  व कर्मचा-यांची कर्तव्ये विहीत करणे व कामावर नियंत्रण ठेवणे.